महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ
शासकीय तंत्र निकेतन इमारत, क विभाग दुसरा मजला, अलियावर जंग मार्ग, 49, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - 400 051.
दूरध्वनी क्रं. (022) 26474435 ईमेल - msbve2003@yahoo.com/२) secretary@msbsde.edu.in

जा.क्र.मराकौविपमं/का-०४/परीक्षा/प्र.का.मुदतवाढ/२०२१/३८२२ दिनांक :- १२/१०/२०२१.

परीपत्रक

विषय - विद्यार्थी प्रवेशास सहामाही, एक व दोनवर्ष अभ्यासक्रमास मुदतवाढ देणेबाबत - परीक्षा जानेवारी २०२२/जुलै २०२२/एप्रिल २०२३.

संदर्भ- मराविकौविमं/का४/परीक्षा/प्र.का./३२२८ दि.१२/०८/२०२१.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परीक्षा मंडळाचे सहामाही, एक वर्ष आणि दोन वर्ष कालावधी अभ्यासक्रमांस **०१ जानेवारी २०२२ ते जुन २०२२, १ जुलै २०२१ ते जुन २०२२ तसेच ०१ एप्रिल २०२१ ते एप्रिल २०२३** या सत्रामध्ये पासून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या परीक्षार्थ्यांसाठी प्रवेश कार्यक्रम वरील संदर्भिय पत्रान्वये यापूर्वीच कळविण्यात आलेले आहे.

परंतु सद्यस्थितीतील कोविड विषाणूंच्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थी प्रवेश करणे संस्थांना शक्य होत नसल्यामुळे सदर सत्रासाठी सहामाही, एक वर्ष आणि दोन वर्ष कालावधी अभ्यासक्रमांस विद्यार्थी प्रवेश करणेसाठी दि. १५.११.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

या पत्रान्वये सादर करण्यात येणारा सुधारीत प्रवेश कार्यक्रम सर्व संबधित संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. खालील नमूद नियोजित कार्यक्रमाप्रमाणे मंडळास माहिती पाठविण्यात यावी.

| अ.क्र. | नियोजित कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | **मंडळाच्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे.**<br>संस्थेने विद्यार्थ्यांकडून **नियमित नोंदणी+परीक्षा शुल्क** (रू. ३००/-) सह नोंदणी अर्ज भरून घेणे. नोंदणी अर्जावर विद्यार्थ्याचे नांव शालांत परीक्षेच्या प्रमाणपत्राप्रमाणे नमूद करावे.<br>संस्थांनी अभ्याक्रमास प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांकडून **नोंदणी+परीक्षा शुल्क** रू. ३००/- मंडळाच्या स्टेट बँक ऑफ इंडिया मधील शाखेत चालू खाते क्र. ३१४८५९९९९५० मध्ये ऑनलाईन भरण्यात यावे. | ०१.०६.२०२१ ते १५.११.२०२१ पर्यंत |
| २ | **अ)** संस्थेने प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची एनरॉलमेंट व प्रवेश अर्जातील माहिती, मंडळाच्या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.सदर माहितीच्या आधारे विद्यार्थ्यांना हॉल तिकीट दिले जात असल्याने विद्यार्थ्याची अचूक माहिती ऑनलाईन भरावी.<br>**ब)** संस्थेने प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची एनरॉल्मेंटची हार्ड कॉपी तसेच नोंदणी शुल्क बँकेत भरलेल्या पावतीच्या मूळ प्रतीं, **इलेक्टिव्ह १ व २ चे विषयांचा तपशिल** आणि प्रवेशित विद्यार्थ्यांची **मंडळाच्या सॉफटवेअरमध्ये तयार केलेली यादी** जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयात जमा करणे. | १७/११/२०२१ ते २२/११/२०२१ पर्यंत |

| | | |
|---|---|---|
| | १) संस्थेने नियमित विद्यार्थ्यांच्या माहिती विद्यार्थ्यांचे नाव, फोटो इत्यांदींचा तपशिल अचूक भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन विद्यार्थ्याचे नांव भरताना अचूक भरावे.<br>२) जिल्हा कार्यालयाने संस्थेकडून प्राप्त झालेल्या माहितीचे संस्थानिहाय फोल्डर तयार करून आपल्या जिल्हयाचे एक फोल्डर तयार करावी. या फोल्डरमध्ये सर्व संस्थांची/विद्यार्थ्यांची माहिती समाविष्ठ झालेली आहे याची खात्री करावी.<br>३) जिल्हा कार्यालयाने मंडळाने मान्यता/नुतनीकरण दिलेल्या संस्थांकरीता स्वतंत्र रजिस्टर तयार करावे व त्यामध्ये ज्या संस्थांनी ऑनलाईन माहिती प्राप्त होतील त्याची दिनांक निहाय नोंद घ्यावी. ज्या संस्थांची माहिती प्राप्त होणार नाहीत त्यांना लेखी कळविण्यात यावे. | |
| ३ | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीची व अभिलेखांची तपासणी करणेसाठी शिबिर आयोजित करणे.<br>***) संबधित संस्थेला अभ्यासक्रम राबविण्याची मान्यता आहे किंवा नाही आणि नुतनीकरण केलेले आहे किंवा नाही याची तपासणी करणे बंधनकारक आहे. मान्यता/नुतनीकरण केल्याची प्रत तपासल्याशिवाय याद्या मंजूर करू नयेत. मंजूरी याद्यांवर जिव्यशिप्रअ यांची दिनांकीत स्वाक्षरी आवश्यक आहे**<br>१) प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अर्हतेच्या अभिलेख्याची पडताळणी करून विद्यार्थी अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यास पात्र आहेत किंवा नाहीत याची तपासणी करणे.<br>२) संस्थेने सादर केलेल्या ऑनलाईन माहिती जिल्हा कार्यालयाचा सर्व संस्थांच्या ऑनलाइन माहिती एकत्रित करून त्यामध्ये असणारी विद्यार्थ्यांची माहिती व संस्थेने जमा केलल्या विद्यार्थ्यांच्या यादीची तपासणी करणे.<br>३) शासकीय तांत्रिक विद्यालयातील कर्मचाऱ्यांची शिबिराप्रसंगी तपासणी करण्यासाठी मदत घ्यावी व तसे आदेश जिल्हा कार्यालय स्तरावरून देण्यात यावेत.<br>४) जिल्हा कार्यालयाने पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या मंजूरीची एक प्रत संबधित संस्थेस देण्यात यावी व दुसरी प्रत मंडळास पाठविण्यात यावी. | १७/११/२०२१<br>ते<br>२२/११/२०२१<br>पर्यंत |

| | | |
|---|---|---|
| ४ | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी मंजूर केलेल्या याद्यांनुसार सर्व संस्थांच्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन एनरॉलमेंटबाबत खालील बाबी नीट तपासून घ्यावा. आणि अचूक माहिती मंडळाकडे पाठविली जावी.<br>१. संस्थेने प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची जिल्हा कार्यालयाने प्रमाणित केलेली विद्यार्थ्यांची मंजूरी यादी.<br>३. नोंदणी/परीक्षा शुल्क स्टेट बँकेत भरलेल्या पावतीची मूळ प्रत तपासून घ्यावी.<br>४. परीक्षा केंद्र यादी<br>५. स्टेशनरी यादी | २५/११/२०२१ पर्यंत |

वरील संदर्भिय पत्रामध्ये नमूद केलेल्या सूचना, अटी/शर्ती कायम असून त्यांचे पालन करून वरील सुधारीत कार्यक्रमानुसार विद्यार्थ्यांची माहिती दिलेल्या मुदतीत मंडळास सादर करण्यात यावी.

**टिप - परीक्षा जानेवारी २०२१/जुलै २०२१/एप्रिल २०२३ या परीक्षांसाठी प्रवेशित विद्यार्थ्यांची परीक्षानिहाय वेगवेगळी माहिती सादर करण्यात यावी.**

आपला,

(के. डी. शिंदे)
सचिव
म.रा. कौशल्य विकास परीक्षा मंडळ
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

प्रति,
जिल्हा व्यवसाय शिक्षण व
प्रशिक्षण अधिकारी, (सर्व)

प्रत :- १) मा. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सादर.
२) परीक्षा यांना माहिती व कार्यवाहीसाठी .
३) संगणक विभाग - सदर पत्र वेबसाईटवर टाकणेसाठी.